# ॥ श्री मारुती स्तोत्र ॥

भीमरुपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती ।
वनारी अंजनीसूता, रामदूता प्रभंजना ॥१॥

महाबळी प्राणदाता, सकळां ऊठवी बळें ।
सौख्यकारी दुःखहारी, दूत वैष्णवगायका ॥२॥

दीनानाथा हरीरुपा, सुंदरा जगदंतरा ।
पातालदेवताहंता, भव्यसिंदूरलेपना ॥३॥

लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीला, पावना परितोषका ॥४॥

ध्वजांगें उचली बाहो, आवेशे लोटला पुढे ।
काळाग्नि काळरुद्राग्नि, देखतां कांपती भयें ॥५॥

ब्रह्मांडें माइली नेणों, आंवळे दंतपंगती ।
नेत्राग्नि चालिल्या ज्वाळा, भृकुटी ताठिल्या बळें ॥६॥

पुच्छ तें मुरडिलें माथां, किरीटी कुंडलें बरीं ।
सुवर्णकटिकांसोटी, घंटा किंकिणि नागरा ॥७॥

ठकारे पर्वताऐसा, नेटका सडपातळू ।
चपळांग पाहतां मोठे महाविद्युल्लतेपरी ॥८॥

कोटिच्या कोटि उड्डाणे, झेंपावे उत्तरेकडे ।
मंद्राद्रीसारखा द्रोणू, क्रोधे उत्पाटिला बळें ॥९॥

आणिला मागुती नेला, आला गेला मनोगती ।
मनासी टाकिले मागें, गतीसी तुळणा नसे ॥१०॥

अणुपासोनि ब्रह्मांडायेवढा, होत जातसे ।
तयासी तुळणा कोठे, मेरुमंदार धाकुटें ॥११॥

ब्रह्मांडाभोंवते वेढे, वज्रपुच्छे करूं शके ।
तयासी तुळणा कैंची, ब्रह्मांडी पाहतां नसे ॥१२॥

आरक्त देखिलें डोळां, ग्रासिलें सूर्यमंडळा ।
वाढतां वाढतां वाढे, भेदिले शून्यमंडळा ॥१३॥

धनधान्य पशुवृद्धि, पुत्रपौत्र समग्रही ।
पावती रुपविद्यादि, स्तोत्रपाठेकरुनियां ॥१४॥

भूतप्रेतसमंधादि, रोगव्याधि समस्तही ।
नासती तुटती चिंता, आनंदे भीमदर्शनें ॥१५॥

हे धरा पंधराश्लोकी, लाभली शोभली भली ।
दृढदेहो निसंदेहो, संख्या चंद्रकळागुणे ॥१६॥

रामदासी अग्रगण्यू, कपिकुळासि मंडणू ।
रामरुपी अंतरात्मा, दर्शनें दोष नासती ॥१७॥

॥ इति श्रीरामदासकृतं संकटनिरसनं श्री मारुतिस्तोत्रं संपूर्णम् ॥